


Published by
Lulu.com
3101, Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

9 781304 461148






*Shikshan Prasarak Sanstha's*

# Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya,

**Kavathe Mahankal, Dist: Sangli, Maharashtra, 416405**

*Proceeding of One Day National Conference on*

## "Bridging Boundaries: Multidisciplinary Research in Science, Commerce and Humanities"

**ONLINE MODE**
**21st March 2024**

**Organized by**

Internal Quality Assurance Cell & Research Development Cell

**Principal**

Prof. (Dr.) M. K. Patil




**Mr. A. A. Kamble**
Co-ordinator IQAC

**Mr. A. S. Pawar**
Co-ordinator
Research Development Cell

**Mr. N. P. Shinde**
Convener
Mob-8080955157

**Price: 600 /-**

**© 2024 by Author's**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached, etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN– 978-1-304-46114-8**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication**,
258/34, Raviwar Peth, Solapur,
Maharashtra, India.
**Contact No.** : 9595359435
**Website:** http://www.lbp.world
**Email ID:** apiguide2014@gmail.com

| | | |
|---|---|---|
| 60. | **"SHIFTING PARADIGMS: GENDER REPRESENTATION IN MARATHI THEATRE WITHIN A MULTICULTURAL CONTEXT"**<br>Mr. Nitish Pandurang Shinde, [1] and<br>Mr. Shivbhushan V. Jadhav [2] | 280 |
| 61. | **THE INTERSECTION OF ART AND SCIENCE IN EDUCATION**<br>Mahammad Rauf Mahammad Ibrahim | 285 |
| 62. | **'घनसाळ' कथासंग्रहातील धर्मचिकित्सा**<br>प्रा.डॉ.मोहन गोविंद लोंढे | 289 |
| 63. | **छत्रपती शिवाजी महाराजांची आदर्श संदेशवहन यंत्रणा**<br>डॉ. मधुकर विठोबा जाधव | 293 |
| 64. | **नव्वदोत्तरी काळातील दलित स्त्रियांची आत्मकथने**<br>प्रा. अर्जुन बंडू राठोड | 298 |
| 65. | **भारताच्या वन विकासामध्ये शासकीय, अशासकीय संघटनांची आणि स्थानिक समुदायाची भूमिका**<br>Miss. Mane S.G. | 302 |
| 66. | **महिला सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान**<br>जितेंद्र मधुकर पेटकर , डॉ. विनोद मारोतराव मुडे | 307 |
| 67. | **उपेक्षित दुर्गरत्न- किल्ले कोळदुर्ग**<br>Mr. Hariprasad Vitthal Pawar | 312 |
| 68. | **"सातपुड्यातील आदिवासी लोकांच्या आरोग्याच्या स्थितीचा अभ्यास -विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा**<br>प्राचार्य.डॉ. दिलीप रामभाऊ जगताप , प्रा. रामदास रमेश वसावे | 315 |
| 69. | **"भारतातील कृषी क्षेत्रातील उद्योजकतेच्या संधी व त्यापुढील आव्हाने"**<br>श्री. श्रीनाथ महादेव शिंदे | 320 |
| 70. | **महाराष्ट्रातील सण-उत्सव ही निसर्ग संस्कृती**<br>डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार | 324 |

# उपेक्षित दुर्गरत्न- किल्ले कोळदुर्ग

**Mr. Hariprasad Vitthal Pawar**
Assistant Professor, Department of History,
Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal,
Dist. Sangli (MH) 416 405.
**Mobile:** 7057848070

**प्रास्ताविक-**

भारतीय युद्धशास्त्रामध्ये किल्ल्यांचे महत्त्व अगदी प्राचीन काळापासून मानले गेले आहे मध्ययुगीन कालखंडामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात गडदुर्गांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. याच गडदुर्गांच्या आश्रयाने छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लढाया जिंकल्या आणि स्वराज्यावर आलेले संकट थोपवले महाराष्ट्रात गडकोट विपुल प्रमाणावर आहेत. महाराष्ट्रातील दुर्गबांधणीची परंपरा किमान दोन हजार वर्षे जुनी आहे सातवाहन, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, यादव, मराठे यांनी महाराष्ट्रामध्ये गडकोटांची एक समृद्धशृंखलाच निर्माण केली. गडदुर्गांच्या बांधणीमध्ये स्थल-काल सापेक्ष बदल दिसून येतात. इतकेच काय पण राजवटीनिहायही बदल दिसून येतात. महाराष्ट्रात आहेत तसे आणि तितक्या प्रकारचे किल्ले भारतात अन्य कोणत्याही राज्यात नाहीत.

**उद्देश-**

१. स्थानिक इतिहासाबाबत जागृती निर्माण करणे.
२. ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण आणि संवर्धन करण्यास प्रोत्साहन देणे

“संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग.दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय.प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे ? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलेले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले हे राज्य तर तीर्थरुप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरूनच निर्माण केले. गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार" ३५० वर्षांपूर्वी रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या आज्ञापत्रामध्ये उद्धृत केलेल्या या वचनावरून गडकोटांच्या अनन्यसाधारण महत्त्वपूर्णतेची ओळख होते. रामचंद्रपंत अमात्य यांनी पुढे जाऊन "नूतन देश साधणे, त्या देशात जी स्थळे असतील ती महप्रयत्ने हस्तवश करावी. ज्या देशात गडकोट नसतील त्या देशात आपले राज्याच्या सरहद्दीपासून पुढे जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयी सेना ठेवून पुढील देश स्वशासने वश करावा असे करीत करीत राज्य वाढवावे, गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी टिकाव धरून राहवत नाही. फौजेविरहित परमुलुखी प्रवेश होणेच नाही इतक्याचे कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटलन्याय आहे." अशा शब्दात गडकोटांचे महत्त्व वर्णिले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्पर्शाने पावन झालेल्या आणि मावळ्यांच्या पराक्रमाचे साक्षीदार असलेल्या या गडकोटांची वर्तमानात काय स्थिती आहे याचा अभ्यास केल्यानंतर हे गडकिल्ले भग्नावस्थेत शेवटच्या घटका मोजत असल्याचे आपल्याला दिसून येईल. महाराष्ट्राच्या आसमंतात असे अनेक किल्ले अशा ठिकाणी बांधले आहेत की, आपल्याला त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी खूप पायपीट करावी लागते, कित्येक डोंगरदऱ्या, ओढे, नद्या पार कराव्या लागतात. अतिशय दुर्गम ठिकाणी किल्ले वसवण्याचे प्रयोजनही तितकेच महत्त्वाचे होते, हे आपल्याला गडकिल्ल्यांच्या डोळस भ्रमंतीतून दिसून येईल काही किल्ले हे आपल्या इतिहासाच्या अज्ञानातून, ऐतिहासिक वास्तूंविषयीच्या अनास्थेतून आणि अवशेषांच्या उचलेगिरीने विनाशाच्या मार्गावर उभे आहेत.

वरील वर्णनाला पुरेपूर उतरणारा कोळदुर्ग हा किल्ला सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्याच्या पूर्वेला आणि कवठे महांकाळ, तासगांव, आटपाडी तालुक्याच्या सरहद्दीवर दूर डोंगरात इतिहासप्रसिद्ध भूपालगड तथा बाणूरगडाच्या सोबतीने वसलेला आहे. या किल्ल्याचे दुर्दैव हे की, स्थानिक लोकांनी या किल्ल्यावरील अवशेष उचलून नेऊन या किल्ल्याला भग्न

स्वरूप आणले आहे. ढासळलेले बुरूज, कोरडा ठक्क पडलेला आणि पावसाच्या प्रतीक्षेत असलेला तलाव, तटबंदी, वीरगळ, इतस्ततः विखुरलेले मंदिरातील अवशेष असा भग्नावस्थेत हा किल्ला उभा आहे पळशी गावातील लोकांच्या म्हणण्यानुसार १९७२ साली पडलेल्या दुष्काळात गावातील लोकांनी एकत्र येऊन कोळदुर्गावरील नक्षीकाम केलेले दगड बैलगाड्यांच्या माध्यमातून पळशी गावात आणून कुलदैवत असणाऱ्या सिद्धनाथाच्या मंदिराच्या उभारणीसाठी आणि शेतकऱ्यांनी आपल्या शेताला बांध घालण्यासाठी वापरले. मंदिराचे स्थापत्यवैभव आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या शेताचे बांध हे अशाप्रकारे कोळदुर्गाच्या विनाशाने उभे राहिले. आजही पळशी गावातील सिद्धनाथाच्या मंदिरात आपल्याला कोळदुर्गावरुन आणलेले नक्षीकाम केलेले दगड, वीरगळ, हत्ती-सिंहादी प्राण्यांची शिल्पे पाहावयास मिळतात कोळदुर्गावरुन आणलेल्या या अवशेषांच्याकडे पाहिल्यानंतर कोळदुर्गावरील तत्कालीन वास्तू (मंदिरे वगैरे) यांच्या वैभवसंपन्नतेची साक्ष पटते

इतिहासप्रसिद्ध किल्ले भूपालगड तथा बाणूरगड आणि शुकाचारीकडून कोळदुर्गाकडे जाताना दोन मार्गानी जाता येते पैकी एक मार्ग शुकाचारीकडून पळशीकडे जाणारा पक्का डांबरी मार्ग आहे ज्यावरून एक फाटा उजव्या बाजूला फुटतो आणि तिथून कच्चा मार्ग शेतातून आणि माळरानावरुन जातो हा मार्ग जेव्हा शेतातून जातो तेव्हा दोन्ही बाजूला असणाऱ्या शेतांच्या बांधांकडे लक्ष दिले तर आपल्याला दिसून येईल की, शेताच्या बांधाला कोळदुर्गाच्या तटबंदीचे दगड आधार म्हणून लावले आहेत. या बांधाच्या दगडांनी शेताचे संरक्षण होत असले तरी कोळदुर्ग मात्र कायमसाठी ओस पडला आहे दुसरा मार्ग हा पूर्णतः डोंगरदरी आणि ओढ्यातून जातो . ज्या मार्गावरून जाताना कोळदुर्गाचे अवशेष विखुरलेले दिसतात तो हा मार्ग कोळदुर्गाचे गतवैभव दाखवतो. हा मार्ग शुकाचारी मंदिराकडे जाणारी दगडी पायवाट जिथून सुरू होते, त्याच्या डाव्या बाजूला एक मळलेली पायवाट पश्चिमेकडे असणाऱ्या गणपती मंदिराच्या मागील बाजूने कोळदुर्गाच्या दिशेने जाते वाटेत जाताना एक ओढा लागतो जो गर्द झाडीने व्यापला आहे. हा ओढा पार करून पुढे जी डोंगराची चढण लागते तो डोंगर म्हणजेच कोळदुर्गाचा डोंगर होय आपण जेव्हा या ओढयातून चालत जातो तेव्हा ओढ्याच्या काठाने तुटलेले नक्षीदार खांब, नक्षीकाम कलेले दगड, जाते, ओढ्यामध्ये घातलेला दगडी बांध आणि झाडांना कठडे (पार) आपल्याला दिसून येईल. हा ओढा पार करून पुढे गेल्यानंतर साधारण १५-२०मिनिटांच्या अंतरावरती कोळदुर्गाची भरभक्कम तटबंदी, गडावरील विखुरलेले अवशेष आणि गडावर कायम वस्ती करून राहिलेले एक मुळचे डफळापुरचे असलेले चव्हाण कुटुंबियांचे घर(जे २०११-१२ सालापासून येथे राहावयास आले आहेत) आपल्या दृष्टीपथात येते. कोळदुर्गाच्या परिसरात चालताना मोठमोठे दगड इतस्ततः विखुरलेले दिसतात. गडाच्या कोणत्याही भागातून पाहिल्यास १००-१२५ एकराचा गडाचा विस्तार आपल्या दृष्टीपथास पडतो. काही जागरूक नागरिकांनी गडावरील विखुरलेले अवशेष जे त्यांच्या वाहून नेण्याच्या क्षमतेच्या मर्यादेत आहेत असे, पाषाणरुपी अवशेष गडावर एका ठिकाणी गोळा करून मोठा दगडी चौथरा बांधून त्यावर ओळीने मांडलेले आहेत त्यामध्ये मान नसलेल्या दगडी नंदीचे शिल्प, महादेवाच्या मंदिराचे अवशेष, फोडलेली महादेवाची पिंड, वीरगळ, एक शिलालेख, कोरीव खांब असे अवशेष आपल्याला पहावयास मिळतात. या अवशेषांच्या पूर्वेकडे पहिल्यास शुकाचारीचा डोंगर, त्याचप्रमाणे इथल्या परिसरातून कुठूनही पाहिल्यास आपले लक्ष वेधून घेणारा कावड्याचा डोंगर, भूपालगड तथा बानुरगड इत्यादी पहावयास मिळतात.

कोळदुर्ग हा किल्ला रायगड-राजगड-तोरणा या किंवा अशाच तत्सम उंच डोंगरावरील किल्ला नसल्यामुळे लढाईच्या आणि संरक्षणाच्या दृष्टीने काही अंगभूत मर्यादाया गडास आहेत. त्याचा विचार करून चारही बाजूंनी तटबंदी बांधलेली आहे मोठमोठे पाषाण एकमेकांवर रचून ही तटबंदीबांधल्याचे दिसून येते काही ठिकाणी ४ फूट तर काही ठिकाणी ६ ते ८फूट उंचीची तटबंदी आपल्याला पाहावयास मिळते. या तटबंदीमध्ये टेहळणीसाठी बांधलेले मोठ्या आकाराचे बुरुज तत्कालीन स्थापत्याच्या भरभक्कमपनाची साक्ष देतात.

**समारोप-**

कोळदुर्गाची ऐतिहासिक कागदपत्रांतून मिळणारी माहिती उपलब्ध नाही. आपण फक्त त्याच्या बांधणीवरून आणि उपलब्ध अवशेषांवरून अंदाज लावू शकतो कोळदुर्गावरील बांधकाम पाहिल्यास विशिष्ट बांधणीचे घडवलेले दगड फक्त एकमेकांवर रचून बांधकाम केल्याचे दिसते इतर गडकोटांप्रमाणे यावर मोठ्या इमारती बांधल्याचे अवशेष उपलब्ध नाहीत. परंतु भूपालगड तथा बाणूरगडाप्रमाणेच याही गडाची रचना दिसते. दोन्ही गड हे घडीव बांधणीचे दगड एकमेकांवर रचून बांधण्यात आलेले आहेत. शिवाय बांधणीवरून असाही अंदाज लावता येतो की, कोळदुर्गाची आणि बाणूरगडाची रचना एकाच कालखंडात झाली असावी. गडासंबंधीच्या काही आख्यायिका-दंतकथा प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये हा गड कोळी राजाने बांधला असल्याचे गावकऱ्यांकडून सांगितले जाते परंतु, यास कोणताही ऐतिहासिक पुरावा अगर आधार उपलब्ध नाही. शिवकाळात स्वराज्याच्या

सीमासुरक्षेच्या दृष्टीने कोळदुर्गास महत्त्वाचे स्थान असावे असा तर्क लावता येतो. कारण, बाणूरगडाप्रमाणेच कोळदुर्गाकडूनही आदिलशाही प्रदेशावर लक्ष ठेवण्यासाठी याचे महत्त्व जरूर आहे. संरक्षणाच्या दृष्टीने या गडास बाणूरगडाप्रमाणेच महत्त्व असल्याचे आपल्याला दिसून येते.

आज एकविसाव्या शतकात किल्ल्यांचे महत्त्व लढाईच्या आणि संरक्षणाच्या दृष्टीने अजिबातच नसले तरी, मराठी माणसाचे, महाराष्ट्राचे आणि पारतंत्र्याला झुगारून देऊन स्वातंत्र्याला आसुसलेल्या जनतेसाठी हे किल्ले कायमच अखंड प्रेरणास्त्रोत आणि स्फूर्तीस्थाने राहिले आहेत. हे किल्ले हे आपल्यासाठी धारातीर्थे आहेत. जो समाज आपला इतिहास विसरतो तो समाज इतिहास घडवू शकत नाही असे आपण म्हणतो, त्याचप्रमाणे ज्या समाजाला इतिहास नसतो त्याचे भविष्यही अंधारात असते. कारण आपला इतिहास आपला मार्गदर्शक असतो.

**संदर्भग्रंथ सूची**

१. खोले विलास (संपा.), **आज्ञापत्र**, लोकवाङमय गृह, मुंबई, २००७.
२. घाणेकर प्र. के., **शिवरायांचे दुर्गविज्ञान आणि दुर्गव्यवस्थापन**, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१५.
३. चिले भगवान, **गडकोट**, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
४. चिले भगवान, **दुर्गम दुर्ग**, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, २०१४.
५. चिले भगवान, **दुर्गसंपदा महाराष्ट्राची**, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, २०१३.
६. तेंडुलकर महेश, **शिवकालातील दुर्ग व दुर्गव्यवस्था**, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०२३.
७. देशपांडे जयंत, **दुर्गदर्शन**, निसर्ग प्रकाशन, कोल्हापूर, २००९.

PVPKM/NC/24/1117

Shikshan Prasarak Sanstha's

# PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA, KAVATHE MAHANKAL, DIST-SANGLI

P.V.P. MAHAVIDYALAYA DIST. SANGLI 416 405. KAVATHE-MAHANKAL

One day National Multidisciplinary Conference (Online Mode)

*"Bridging Boundaries: Multidisciplinary Research in Science, Commerce & Humanities"*

# Certificate

This is to certify that **Mr. Hariprasad Vitthal Pawar,** Assistant Professor, of Department of History, Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal, Sangli Maharashtra has attended/ participated in the One day Online National Conference on *"Bridging Boundaries: Multidisciplinary Research in Science, Commerce & Humanities"* organized by **Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe Mahankal Dist: Sangli, Maharashtra** on Thursday, 21st March, 2024.

**He has presented a research paper entitled :- "उपेक्षित दुर्गरत्न- किल्ले कोळदुर्ग"**

| Mr. A. A. Kamble | Mr. A.S. Pawar | Mr. N.P. Shinde | Prof. (Dr.) M. K. Patil |
|---|---|---|---|
| IQAC Co-ordinator | Research Development Cell | Convener | Principal |